
पश्चिम निमाड मधील दुष्काळ आणि आदिवासींचे अनुभव

कोरडे-रखरखीत

# रूखी -सुखी



एकलव्य





कोरडे-रखरखीत

# रूखी-सुखी



## पश्चिम निमाड मधील दुष्काळ आणि आदिवासींचे अनुभव


आधारशिला शिक्षण केंद्राच्या
विद्यार्थ्यांनी केलेली प्रस्तुती

चित्रे आणि रचना
नर्गिस शेख



एकलव्य

## या पुस्तकाविषयी...

दुष्काळाचे नाव घेताच आपल्या डोळ्यासमोर येते ती म्हणजे वाळलेली शेतजमीन. पण शेतकऱ्यांच्या मते पीक न होण्याची अनेक कारणे असतात जसे जनावरं, कीड, जास्त पाऊस किंवा अवकाळी पाऊस. इतिहासात अनेकदा अशी परिस्थिती येऊन गेली आहे जेव्हा काहीच पिकले नाही आणि अनेकजणं भुकेने तडफडून दगावली. शेतकऱ्यांच्या आठवणीत त्यांचे किंवा त्यांच्या पूर्वजांचे हे अनुभव आजतागायत जिवंत आहेत जे त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतींना आणि निर्णयांना प्रभावित करतात.

इतिहासकार दुष्काळ किंवा भूकबळींबद्दल क्वचित कधीतरी बोलतात खरं, परंतु त्यांचे बहुतांश कथन हे संपन्न वर्गांच्या वर्णनांवर आणि सरकारी किंवा इतर लिखित स्रोतांवर आधारित असते. किंवा त्यांचे कथन एखाद्या प्रमुख घटनेच्या भोवती रचले जाते. सर्वसामान्य लोकांच्या अनुभवांतून आपल्याला तत्कालीन दैनंदिन जीवनाचे चित्र दिसते ज्यातून प्रमुख घटनांचे इतर पैलू लक्षात येतात. यातून तेव्हाच्या बिकट परिस्थितीचा अंदाज येतोच पण हेही समजते की जेव्हा पीक नसेल तेव्हा काय-काय खाता येऊ शकते, जंगलातून काय-काय मिळते, दुष्काळ किंवा पूर प्रसंगी कोणते पीक घेता येते इत्यादी. ही माहिती गावातल्या ज्येष्ठ मंडळींकडे मौखिक परंपरेच्या रूपाने अजूनही जिवंत आहे. आजही जेव्हा पाऊस कमी होतो तेव्हा ते या गोष्टी आठवून त्याचा उपयोग करतात.

असे असूनही मोजक्याच इतिहासकारांनी मौखिक परंपरेत अस्तित्वात असलेल्या या ज्ञानाचा अवलंब केला आहे. केवळ उत्तम इतिहास लेखनाच्या दृष्टीने नव्हे परंतु पारंपरिक ज्ञान संग्रहित करण्याच्या दृष्टीने देखील सरकारी नोंदींसोबत मौखिक नोंदी विचारात घेणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ मौखिक नोंदी वाचून हे लक्षात येते की उपासमारीशी सामना करताना सरकारी योजनांच्या तुलनेत जैवविविधता कितीतरी पटीने महत्त्वाची आहे. कारण अशा प्रतिकूल परिस्थितीत सरकारवर अवलंबून राहण्याऐवजी जैवविविधता लोकांना स्वयंपूर्ण आणि सक्षम बनवते.

आधारशिलाच्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी केलेला हा प्रयत्न इतिहास लेखनाच्या भवितव्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. हा प्रयत्न हेच सिद्ध करतो की लहानशा गावातील आदिवासी मुलंसुद्धा संशोधन करू शकतात, इतिहास लिहू शकतात. सामान्य जनतेला आपलंस वाटेल अशा भाषेत आपले विचार मांडू शकतात. असे प्रयत्न समाजाचे दैनंदिन जीवन आणि इतिहास यांतील दरी कमी करायला मदतच करतील.

## हि कहाणी सुरु झाली तरी कशी.....

गावातल्या वयोवृद्धांकडून आपल्या परिसराची माहिती घेणे आणि लिहिणे हा आधारशिलाच्या इतिहास अध्ययनाचा अविभाज्य भाग आहे. असे असताना जेव्हा 2000 साली एका स्थानिक संघटनेने दुष्काळ पडल्यामुळे रॅली काढली तेव्हा एका प्रश्नाने तोंड वर केले-दुष्काळ असतो तरी काय?

आजूबाजूची काही शेतं विहीरीच्या पाण्यामुळे हिरवीगार दिसत होती. तेव्हा असे ठरले की मुले गावात जातील आणि हे शोधून काढतील की दुष्काळ नक्की पडलाय की नाही. ते माहिती गोळा करतील की या वर्षी शेतात काय पिकले, काय नाही, आणि भूतकाळात पडलेल्या दुष्काळाविषयी सुद्धा विचारपूस करतील.

गावकऱ्यांशी बोलून आल्यावर असे लक्षात आले की भूतकाळातील दुष्काळाशी निगडित अनेक रोचक गोष्टींनीच मुलांच्या वह्या भरून गेल्या होत्या. या वर्षी काय पिकले काय नाही या विषयीची माहिती दोन-चार ओळीतच संपली होती. आजूबाजूच्या गावातील दहा-बारा वयोवृद्धांशी बोलून हे लिखाण केले होते. यात 1899 च्या राजस्थानमधल्या छप्पनियामधील दुष्काळापासून ते अगदी काल परवा पडलेल्या दुष्काळापर्यंतची माहिती गोळा झाली होती.




या माहितीत जमलेल्या प्रश्नांना वेगळे करून लिहिण्याचे मोठे संपादकीय कामसुद्धा मुलांनीच केले. काही गोष्टी समजल्या नव्हत्या त्या पुन्हा जाऊन विचारल्या. या संपूर्ण कामाला महिना दीड महिना लागला. अगदी किरकोळ संपादनासोबत हे काम इथे प्रस्तुत करत आहोत.



मुलांनी केलेल्या या संशोधनाचे उदाहरण राष्ट्रीय अनुसंधान व प्रशिक्षण केंद्र (NCERT) यांच्या शिक्षण व कार्यपुस्तिकेत सुद्धा घेतले आहे- हे दाखवण्यासाठी की शिक्षण निव्वळ उपलब्ध ज्ञान देणे आणि मुलांनी ते पचवणे नसून खऱ्या अर्थाने शिक्षण तेच जे विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी ज्ञानाच्या नवनिर्मितीचे एक माध्यम बनू शकेल.



पुन्हा एकदा नमूद करू इच्छितो की हा प्रयत्न दोन स्तरांवर अतिशय महत्त्वाचा आहे. शालेय पातळीवर मुलांना इतिहासाचा परिचय व ज्ञान निर्मितीच्या प्रक्रियेमागील दृष्टीचा परिचय करून देणे. तसेच आजकाल उंच इमारतीत बसलेले मोठमोठे अधिकारी आणि विशेषतज्ज्ञ अन्न टंचाई सारख्या विषयावर अंतहीन वादविवाद करताना दिसतात. या उच्चस्तरीय वादातून हेच निष्पन्न होते जे आधारशीलाच्या मुलांनी केलेल्या शोधकामातून सरळ-सोप्या मार्गाने कळते की या संकटाशी सामना करण्यासाठी जैव विविधता हे असे शस्त्र आहे ज्यात लोकांना आणि देशाला स्वावलंबी बनवण्याची ताकद आहे.

चला तर मग! मुलांच्या या शोधयात्रेचे सहप्रवासी होऊया.

एकलव्य व आधारशिला समूह, फेब्रुवारी 2014



# कोणत्या वर्षी दुष्काळ पडला होता?

साकड गावच्या रावलिया बाबांनी सांगितलं की 20 वर्षांपूर्वी दुष्काळ पडला होता. डोंगरसिंह बाबांनी सांगितलं की 56 वर्षांपूर्वी पडला होता. धालवी माई आणि श्रीरामनं सांगितलं की 80 वर्षांपूर्वी दुष्काळ पडला होता.

मवीस आणि इतरांकडे असलेल्या माहितीनुसार ज्या लोकांना भूतकाळातील दुष्काळाची स्मृती होती ती अशा प्रकारे आहे-



| वर्ष | सांगणारे | गाव |
|---|---|---|
| 1899 (छप्पनिया दुष्काळ) | मोतीराम भाऊ<br>चुन्नीबाई<br>रावलिया बाबा | साकड |
| 1917 | श्रीराम | साकड |
| 1943 | रामा भाई | मोगरी |
| 196 | रावलिया बाबा | साकड |
| 1984 | डोंगर सिंह | साकड |




छप्पनियाचा दुष्काळ हा फार भयंकर होता. या दुष्काळाने संपूर्ण देशभरातच मृत्यूचे प्रमाण वाढले होते. चाटलीत मात्र याचा इतका दुष्परिणाम झाला नव्हता. हरचंद बाबांच्या म्हणण्यांनुसार रिमझिम पाऊस पडत राहिला. जंगलात नेवाडच्या ज्या नव्या जमिनी होत्या तिथे बाजरी पिकली होती.



# दुष्काळ का पडला?




रेल्वे सुरू झाल्याने दुकानदार नफा कमवण्यासाठी धान्य बाहेर विकू लागले. या कारणामुळे देखील काही ठिकाणी धान्याची कमतरता निर्माण झाली.



पाऊस खूप कमी झाल्याने दुष्काळ पडला. सगळं पीक गेलं. आधी जेव्हा थोडासा पाऊस झाला तेव्हा लोकांनी धान्य पेरलं होतं. त्यानंतर पाऊस पडलाच नाही. त्यामुळे जे उगवलं होतं तेही पीक मरून गेलं. पाऊस वेळेवर पडला नाही, त्यामुळे पीक मेलं. नदी-नाले पण कोरडे पडले. फक्त एखाद-दुसऱ्या झऱ्याला प्यायचं पाणी होतं. झाडं पण खूप प्रमाणात नष्ट झाली.


मोगरीच्या रामा भाईंनी सांगितलं की एकदा उंदरांचा प्रचंड सुळसुळाट झाला होता. त्यावर्षी उंदीर खूप माजले होते. त्यांनी सगळं पीक खाऊन टाकलं. धान्यपण फस्त केलं. म्हणून याला उंदरांचा दुष्काळ म्हणतात. काही लोकांचं म्हणणं आहे की या दुष्काळात लोकांनी उंदरांच्या लेंडया धुवून त्यातील धान्याचे दाणे दळून खाल्ले होते.

अशाच प्रकारे एका वर्षी टोळ धाड झाली. टोळांनी अख्खं पीक फस्त केलं. त्यामुळे दुष्काळ पडला. याला टोळांचा दुष्काळ म्हणतात. या काळात लोक घमेली घेऊन शेतावर जात आणि टोळांना पळवून लावायला ठणठण ठणठण असा आवाज करत.



आदिवासींची अशी समजूत आहे की मडक्यात मीठ भरून जमिनीत पुरलं की दुष्काळ पडतो. असाही समज आहे की जर गावात कावळ्यानं अंडी दिली तर त्या गावात पाऊस पडत नाही.















# दुष्काळात लोक काय खाऊन जगले?

दुष्काळात काही पिकलंच नाही. ज्याला जे मिळेल त्याने ते खाल्लं. झाडाची पानं, सालं, गाय-बैलांची हाडं- लोकं मिळेल ती गोष्ट भरडून खात होते.

लाल ज्वारी, जव, गहू, बट्टी पासून केलेल्या पोळ्या, कुळीथाची पोळी, मोखा, चीवलिया, पाँजनिया आणि पुवाडियाची भाजी असं खायचे. भाजी आणि धान्य एकत्र करूनही खात होते. मोख्याच्या खोडाची साल वाळवून, बाजरीसोबत दळून पोळी बनवून खायचे. असं सांगतात की बीलीची पानं, मोखाच्या साली आणि बाजरी यांचं पीठ करून खायचे. दुष्काळात जंगली पाला पण मिळायचा नाही. धान्य खूप महाग होतं. एक रुपयाला पाच किलो धान्य मिळायचं. पण दुष्काळात तर पाच रुपयाला एक किलो धान्य मिळणं सुद्धा कठीण झालं होतं. त्यामुळे लोकं ज्वारीची पेज प्यायचे. हि पेज ज्वारीला पाण्यात घोळून, उकळून बनवतात. धान्यच कमी असल्यामुळे पेज इतकी पातळ बनवायचे की जेव्हा ती थाळीत वाढायचे तेव्हा घरातील छपराच्या वास्यांचं प्रतिबिंब त्यात दिसायचं.

केनियाची रोटी करून खायचे. पुवाडियाच्या बियांची सुद्धा आमटी करून खाल्ली जायची. मक्याची रोपटी पण खायचे. वयोवृद्धांचे म्हणणं आहे की दुष्काळात लोकं मूठभर धान्य आणि मडकंभर पाणी पिऊन जगले आहेत. टेंगरु, बील, बोर, पिंपळ, कुसेमडा आणि उंबराची फळं खाल्ली आहेत. मोहाच्या फुलांना वाफवून त्यात थोडं पीठ पेरायचे. वडाची फळंसुद्धा खाल्ली आहेत लोकांनी! टेंगरु आणि कौडाईच्या बियांना दळून खाल्लं आहे. उन्हाळ्यात चिंच, आवळा आणि जांभळं खाल्ली आहेत.

बोराच्या बियांना तव्यावर शेकून खात असत. जंगली केळ्याची फुलं आणि मुळं उकरून खात असत. असं म्हणतात, की जी फळं मिळायची ती खायचे.

दुष्काळात लोकांनी झाडांच्या सालीपण खाल्ल्या आहेत. उंबर, पिंपळ, पळस, सालाई, काटेसावरी, सागवान, दावडे, गोयणा, मोह आणि आंब्याच्या झाडाच्या साली कुटून खात असत. काही दिवसांत झाडाची सालही मिळेनाशी व्हायची. चाटली गावच्या हरचंद बाबांनी सांगितलं की लोकं सागवानाची मुळंही खायचे. कौडाई आणि बांबूचे कोवळे कोंब, अर्धा ज्वारी अशा सगळ्या गोष्टी खाल्ल्या आहेत. लोकांनी निंबोणी, कंजीच्या बियांना दळून खाल्लं आहे. असं म्हणतात की काळी माती सुद्धा खात असत.

आपण हाडं खात नाही पण दुष्काळ पडला तेव्हा तीही खावी लागली. या हाडांचं पीठ केलं आणि त्याची पोळी करून खाल्ली. आपल्यात जे बैलाचं मांस खातात त्याला ‘कुटवाल’ म्हणतात, परंतु त्यांनाही खावं लागलं. लोकांनी मेलेली ढोरं पण खाल्ली. ‘आम्ही खात नाही’ असं म्हणणाऱ्यांनाही खावं लागलं. किडेसुद्धा भाजून खाल्ले. असं सगळं खाल्लं आणि जगले. भुकेनं व्याकुळ होऊन खूपजण मेले. लोकांनी आत्महत्याही केल्या. खाण्याच्या शोधात लोकं इकडे तिकडे, जंगलात भटकले. काही मेले देखील, तेव्हा जंगलात कोल्हे ओरडत राहायचे.









## पाणी प्यायला कुठे जायचे?

साकड गावात रीछडे डोंगराच्या कपारीत पाणी होतं. नदीत एका ठिकाणी विहिरीसारखा खड्डा होता जिथे लोकं पाणी प्यायला यायचे. कित्येक जणांनी पाणी पिता पिता आपला जीव गमावला. चाटलीची लोकसुद्धा 4 किलोमीटर लांबून रिछडे डोंगरातूनच पाणी भरून घेऊन जायची.

आछलीचे जाडिया भाई सांगतात की गावातल्या छोट्या नदीला फट होती. त्यात पाणी होतं. आपण पाणी वाचवायला हवं. काही गावांत तर तहान भागवायला लोकांनी बकरी आणि माकडाचं मूत्र प्यायलं आहे. काही लोकांनी नदी-नाल्यांतील डबक्यात जमा झालेलं चिखलाचं पाणी देखील प्यायलं आहे.





## दुष्काळात जनावरं आणि पक्ष्यांचं काय झालं?

लोकांना खायला काहीच मिळालं नाही. बरेच जणं भूकमारीने दगावले. पक्ष्यांना दाणा-पाणी-किडे न मिळाल्याने त्यासुद्धा गेल्या. पक्षी बैलाच्या पाठीवर बसून त्याच्या कातडीवर चोचीने टोचून टोचून त्यांना मारून टाकत. जनावरांनाही काही खायला मिळायचं नाही. जंगलात जाऊन ते झाडांची सालं खात असत. खूप जनावरं नष्ट झाली. शंभरात एखाद-दुसरं जनावर जगलं.









## दुष्काळात लूटमार



सरपिया भाऊंनी सांगितलं की दुष्काळ पडला त्या वर्षी खूप लूटमार झाली होती. राजपुरातही चोरी झाली. लुटणारे जिवंत प्राण्यांचे लचके तोडून खात असत.

दूधखेडाच्या जगादार भाऊंनी सांगितलं की दिवसा-ढवळ्या लोक धान्य चोरी करायला यायचे. ज्यांच्याकडे धान्य होतं ते चोरी होण्याच्या भीतीनं त्याला जमिनीखाली पुरून ठेवायचे. थोडं थोडं काढून खायचे. चाटलीच्या हरचंद बाबांनीही सांगितलं की बाजरी पुरून ठेवायचे. चोरांच्या भीतीनं कच्चीच बाजरी खाऊन टाकायचे. चुलीचा धूर बघून भुकेली लोकं येतील म्हणून लपून-छपुन भाकरी करून खायचे.

## सरकारी मदत

बडवानीच्या राजाने लोकांना मदत केली होती. त्याने लोकांना धान्य आणि कपडे दिले. सरपियाच्या वडिलांनी म्हणजे तेरसिंहनी सांगितलं की त्यांच्या ऐकण्यात आलं होतं की उपाशी लोकांसाठी सेंधवा सरकारद्वारे किल्ल्यावरून तांदूळ फेकला जायचा. हा तांदूळ खाऊन खूप लोकं मेली.

एका दुष्काळात परदेशी गहू आला होता. हा गहू सरकारने लोकांना रेशनमधून दिला. दुष्काळात ज्वारीपण रेशनवर मिळाली होती. हीच ज्वारी लोकांनी पेरली जिला आज कंटलाई ज्वारी म्हणतात.

मुन्ना आणि त्याच्या साथीदारांनी हेही शोधून काढलं की एका तेल्यानं लोकांना धान्य देऊन मदत केली होती.





# दुष्काळातल्या दुसऱ्या वर्षी काय झालं?

चाटलीच्या हरचंद बाबांनी सांगितलं की दुष्काळातल्या दुसऱ्या वर्षी जिथे-तिथे, डोंगरावर, जंगलात सगळीकडे काचरा आणि काकडी पिकली. लोकांकडे शेती करायला बैल नव्हते. मग लोकांनी पालसूदच्या बाजारातून उधारीवर बैल मागून आणले होते.

अन्नधान्य घ्यायला बडवानीला जावं लागायचं. तिथे जाऊन यायला एक रात्र आणि दोन दिवस लागायचे. रात्री तिथेच थांबावं लागायचं.

पांजरिया गावच्या राजू भाऊंनी असं सांगितलं की त्यांच्या भागात सगळी पिकं बरी आली होती .

| मेलेली पिंक | जगलेली पिंक |
|---|---|
| चवळी | भुईमूग |
| सोयाबीन | उडीद कमी पिकलं |
| ज्वारी | मूग थोडाच पिकला |
| बट्टी | मठिया |





# दुष्काळात फायदा कोणाचा झाला?

दुष्काळात दुकानदार आणि सावकारांचा फायदा झाला. दुकानदारांनी धान्य दडपून ठेवलं. धान्याची किंमत खूप वाढवली.

आदिवासी उपाशी मरत होते तरीही दुकानदारांनी धान्य दिलं नाही. जी लोकं जनावरांचं चामडं विकायचा धंदा कारायचे त्यांचाही फायदा झाला असावा. यावरून आदिवासी आणि सावकारांमध्ये वेळो-वेळी संघर्ष झाला.



## दुष्काळात संघर्ष

कोण्याएका दुष्काळात गुजरातमधल्या दाहोदच्या आसपासचे हजारो भिल्ल संघटित झाले आणि दाहोदमध्ये मोर्चा काढला. नफाखोरी करणारे दुकानदार आणि सावकारांच्या डोक्यावर पाण्याने भरलेला माठ ठेवून त्यांना रॅलीत चालवले. नंतर तो माठ फोडून टाकला. या सांकेतिक कृतीतून आदिवासींनी असा बोध घेतला की पैसे कमावण्यासाठी सावकारांनी जे पाणी अडवून ठेवलं होतं त्याला आता वाट मिळाली. ज्यांच्या घरात धान्य लपवून ठेवलं होतं ते बाहेर काढून सगळ्यांमध्ये वाटून टाकलं.

1900 च्या सुमारास झाबुआ जिल्यात दुष्काळी स्तिथी निर्माण झाली होती. आलीराजपुरच्या राणीने तिथल्या आदिवासींच्या अन्नधान्याची काहीच सोय केली नव्हती. तेव्हा जवळच्याच सोरवा प्रांताचा म्होरक्या छीतू किराड याने आदिवासींना संघटित केले. भोवतालच्या कसब्यातील व्यापारी आणि बोहरांच्या घरातून धान्य काढून सगळ्यांमध्ये वाटले.

-शिक्षकांनी दिलेल्या माहिती नुसार






PAISE
TWENTY
FIVE
JANUARY 1924





# कमी पाण्यात येणारी पिंक

जेव्हा पाऊस कमी व्हायचा तेव्हा लोक कमी पाण्यात येणारी पिकं घ्यायचे. यामुळे काही महीने तरी गुजराण व्हायला मदत मिळायची. परंतु आज यातल्या अनेक पिकांची बियाणंदेखील शिल्लक नाहीत, केवळ नावं उरली आहेत.

| पिकाचं नाव | किती पाणी लागतं (पाऊस) | किती वेळ लागतो | बियाणं उपलब्ध आहे/नाही |
|---|---|---|---|
| पाण्यातला गहू | 2 पाणी | 3 महीने | नाही |
| पांढरा मका | 2 पाणी | 2 महीने | आहे |
| रातली मका | 3 पाणी | - | आहे |
| कूकडाई मका | 2 पाणी | - | आहे |
| पिवळा मका | 1 पाणी | 1 महिना 20 दिवस | आहे |
| छोटा मका | 3 पाणी | 2.5 महीने | नाही |
| मूग | 2 पाणी | 2 महीने | आहे |
| चमकी मूग | 2 पाणी | 2 महीने | नाही |
| सरादिया मूग | 3 पाणी | 2.5 महीने | नाही |
| नानली बट्टी | 3 पाणी | 3 महीने | नाही |


| | | | |
|---|---|---|---|
| बट्टी | 2 पाणी | 3.5 महीने | नाही |
| मोठी बाजरी | 2 पाणी | 2 महीने | - |
| कुटार बाजरी | 2 पाणी | 3.5 महीने | नाही |
| नानली दादर | 1 पाणी | ५ महीने | आहे |
| सातपानाई ज्वारी | 3 पाणी | 3 महीने | आहे |
| नानली तांदूळ/ चवला | 3 पाणी | 3 महीने | नाही |
| भुगडाई उडीद | 2 पाणी | 2.5 महीने | नाही |
| चचरिया चण | 1 पाणी | ५ महीने | आहे |
| कुकी भादी | 2 पाणी | 2.5 महीने | नाही |
| डुचकी साव वरई | 2 पाणी | 2.5 महीने | नाही |
| | | | |







# दुष्काळातल्या दंतकथा



एक लोककथा अशी आहे की एका कुटुंबाला एक मक्याचा दाणा मिळाला. तो दाणा उकळून त्याचं पाणी ते प्यायचे. दुसऱ्या दिवशी दाण्याला पुन्हा उकळून त्याचं पाणी प्यायचे. एके दिवशी तो दाणा एका लहान मुलाच्या हाती लागला. त्यानं तो खाऊन टाकला. त्यामुळे कुटुंबातले सगळे लोक मरण पावले.

अशाच एका कथेनुसार तुरीचा एक दाणा ज्याला पाण्यात उकळून पिता पिता दीड महिना काढला. नंतर तो दाणा एका माणसाने खाल्ला तर भुकेनं सगळे मृत्युमुखी पडू लागले. आणखी एक किस्सा तर तिळाच्या दाण्या इतक्या छोट्या बट्टीच्या दाण्याचा! त्याला एका माठभर पाण्यात उकळून, त्याचं पाणी प्यायल्याचा उल्लेख आहे.


अशा प्रकारच्या कथा चाटली आणि साकड गावच्या अनेक वृद्धांनी ऐकवल्या. झाबुआत सुद्धा अड्डा गावच्या अंगा बाबांनी अशीच कथा सांगितली.

एक बाई आपल्या मुलाच्या डोक्यातल्या उवा काढत होती. मुलाचा हात खेळता खेळता आईच्या तोंडापाशी गेला. आई इतकी भुकेली होती की तिने आपल्या मुलाच्या हाताचा तुकडा तोडून तो खाऊन टाकला. रावलिया बाबांनी तर असं ऐकलं होतं की अख्खा मुलगाच खाऊन टाकला.

मोगरीचे राम बाबा 55 वर्षांचे आहेत. त्यांनी त्यांच्या पूर्वजांकडून भूतकाळातील दुष्काळाच्या अनेक कथा ऐकल्या आहेत. त्यांनी सांगितले की मुलं खूप रडत असतील तर त्यांना डोंगरात झाडाखाली सोडून दिले जायचे. चाटलीच्या हरचंद बाबांनी देखील ऐकले आहे की झोपलेल्या मुलांना तसेच सोडून त्यांचे आई-वडील कुठे तरी निघून जायचे.

चाटलीच्या चुनी बाईने सांगितले की ज्वारीची पातळ पेज बनवून प्यायली जायची. ही पेज ज्वारी पाण्यात टाकून, उकळवून बनवली जायची. धान्यांच्या कमतरतेमुळे पेज खूप पातळ बनायची. इतकी पातळ की जेव्हा थाळीत पेज प्यायला बसायचे तेव्हा छपरावरील वास्यांचे प्रतिबिंब त्यात दिसायचे. पेजेत पाहून वासे मोजता यायचे असे सुद्धा म्हणतात. खाता-खाता थाळी फुटली तेव्हा पेज सांडली. त्या दिवसापासून घरात चांगला स्वयंपाक होऊ लागला. सर्व धान्ये स्वयंपाकात वापरली जावू लागली.






# दुष्काळापासून बचाव करण्याचे मार्ग

पहिल्यापासून धान्य आणि पैसे जमवून ठेवले पाहिजेत. जनावरांसाठी देखील घरात चारा साठवून ठेवायला हवा. आधी भादी बट्टी खूप पिकवायचे. श्रीरामच्या घरी आम्ही खूप मोठ्या मोठ्या कांजीया पहिल्या आहेत. काही लोक तर 7-8 वर्षांपर्यंत भादी ठेवायचे. दुष्काळात हे धान्य उपयोगी पडायचं, इतरांनाही दिलं जायचं.

पाणीही साठवून ठेवायला पाहिजे. गुजराथमधील सौराष्ट्र भागात, जिथे सतत दुष्काळजन्य परिस्थिती असते तिथे लोक पाणी खूप जपून वापरायचे. घराच्या खाली टाकी बांधायचे. छतावर पडणारं पावसाचं पाणी नळ्यांमार्फत टाक्यांमध्ये साठवायचे. पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी टाकीत कासव आणि मासे सोडायचे. पाण्याची टंचाई झाली की हे पाणी आंघोळीला वापरत असत. मुलांना घमेल्यात बसवून आंघोळ घालायचे आणि मग ते पाणी झाडांना घालायचे. कपडे, भांडी  धुण्यासाठी वापरलेले पाणीसुद्धा झाडांना घातले जायचे. अशाप्रकारे दुष्काळापासून बचाव करता येतो.

काही पिकं कमी पाण्यावर उगतात, अशी अनेक पिकं घेतली पाहिजेत. असं केल्यानं कोणतं ना कोणतं पिक उगवेलच. वर्षोनुवर्षे जुनी विविध प्रकारची बियाणं जपून ठेवली पाहिजेत व वेळोवेळी त्याचं पीकही घ्यायला हवं. दुष्काळापासून बचाव करायचा असेल तर शेतात एकच पीक



घेऊन उपयोग नाही. सोयाबीन पिकवू नये, विदेशात तर त्याला डुकराचं खाद्य मानलं जातं. डुकरांसाठी शेती करायची की आपल्या मुलांना खायला घालायला याचा विचार करणे गरजेचे आहे.

पावसाच्या पाण्याला अडवलं पाहिजे. यासाठी डोंगरावर मोठ्या दगडांनी बांध घातले पहिजेत. लाकडी ओंडक्यांच्या मदतीने पाण्याचा रस्ता अडवला पाहिजे. डोंगरावरील झाडांना वाचवलं पाहिजे. आपल्या घर आणि शेताच्या भोवताली खूप झाडं लावली पाहिजेत. शेतात पाणी अडवण्यासाठी बांध बनवले पाहिजेत. बांधावर झाडं लावली पाहिजेत. जंगलं वाचवली पाहिजेत. बांध आणि झाडांमुळे पाणी अडेल आणि जमिनीत खोलवर मुरेल. यामुळे विहिरी आणि झऱ्यातलं पाणी वाढेल. पाऊस कमी झाला तरी विहिरीचं पाणी वापरता येऊ शकतं. धन-धान्याची बचत मात्र पहिल्यापासूनच करायला हवी.





# शेवटची गोष्ट

एके दिवशी वरुण देवतेने असे ठरवले की पृथ्वीवर 9 वर्षे पाऊस पडता कामा नये. आणि तसेच झाले. एक शेतकरी होता जो दर वर्षी आपलं शेत नांगरून ठेवायचा.

पुढच्या वर्षी पाऊसच झाला नाही तरीही त्याने आपले शेत नांगरले. पुढे कित्येक वर्षे पाऊस पडला नाही परंतु शेतकऱ्याने आपले शेत नांगरलेच.

एक दिवस तो शेत नांगरत असताना वरुण देवता त्याच्या जवळ आले आणि त्याला विचारलं, “तू शेत का नांगरतोयस? पाऊस अजून अनेक वर्षे पडणार नाहीये. उगाच का श्रम घेतोयस? जरा बघ, तुझ्या सोबतचे सगळे लोक दुसरी कामं शोधायला निघून गेलेत”. शेतकरी म्हणाला, “मी शेत नांगरलं नाही तर मी नांगर चालवणंच विसरून जाईन. माझ्या शेतीची अवजारं पडल्या पडल्या गंजतील आणि माझे बैलसुद्धा शेतीच्या कामा लायक राहणार नाहीत. आणि कधी ना कधी तरी पाऊस पडेलच. मग तेव्हा मी शेती कशी करू शकेन? म्हणूनच पाऊस पडो वा न पडो मी शेत नांगरणं सोडणार नाही”.

शेतकऱ्याचं म्हणणं ऐकून वरुण देवता विचारात पडले. त्यांनी विचार केला की जर हा शेतकरी शेती करायचं विसरू शकतो, तर आपणही बरसायचं विसरू शकतो. वीज चमकवणं आणि गरजणं पण विसरू शकतो. असं झालं तर काय होईल? असा विचार करून वरुण देवतेने त्वरितच पाऊस सुरू केला.

त्यामुळे दुष्काळ पडो किंवा पूर येवो, शेतकरी तर शेती करतातच. स्वतःच्या आयुष्यात जोखीम पत्करून पीक उगवतातच. म्हणूनच तर जगात लोकांना खायला मिळतं.









**आधारशिला शिक्षण केंद्र** हे बडवानी जिल्ह्यातील साकड गावात आहे. याची सुरुवात 1998 मध्ये लोकांच्या सहभागातून आणि पुढाकारातून झाली. ही एक निवासी शाळा आहे जिथे आदिवासी मुले शिकतात. इथे आदिवासी संस्कृती, जीवन मूल्य, इतिहास यांना विचारात घेऊन आणि त्यांच्याशी ताळमेळ राखत शिकवले जाते. मुले इथे जैविक शेती करतात, रॅली आणि मोर्च्यात शामिल होतात. स्थानिक इतिहास आणि लोककथांचे संकलन करतात, नाटक बसवून वेगवेगळ्या ठिकाणी सादर करतात, शिवाय पुस्तकेही लिहितात. ही आनंदी मुलांची मौजमजा असलेली शाळा आहे. पालकांनी दिलेले पैसे, धान्य आणि हितचिंतकांकडून मिळालेल्या देणग्यांवर शाळा चालते.

एखादी गोष्ट स्वतः करून आणि समाजातल्या अडचणींना तोंड देऊन शिकणे ही आधारशिलातील शिक्षणाची खासियत आहे.

अशी शिक्षण पद्धती जी आपल्या आयुष्यातील प्रश्नांची उत्तरे शोधायला मदत करते ती घोकंपट्टीला नव्हे तर शिक्षक आणि विद्यार्थी यांनी सोबत निर्माण केलेल्या ज्ञानाला महत्व देते.

**नर्गिस शेख** नाशिकच्या मातोश्री महाविद्यालयात अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहेत. चित्रकला आणि छायाचित्रणात रस असलेल्या नर्गिसला लहान मुलांच्या पुस्तकांसाठी चित्र काढण्यात आणि त्यांचे प्रकाशन करण्यात विशेष रस आहे. लांबच लांब प्रवास करावेत आणि नवनवीन गोष्टी शिकत राहाव्या अशी त्यांची इच्छा आहे.



कोरडे- रखरखीत

# रूखी -सुखी

पश्चिम निमाड मधील दुष्काळ आणि आदिवासींचे अनुभव

आधारशिला शिक्षण केंद्राची निर्मिती
चित्रे आणि रचना: नर्गिस शेख
छायाचित्र: नर्गिस शेख आणि इतर
अनुवाद: कल्याणी झा
संपादन: संकेत राऊत आणि ईशा बडकस

लेखन व चित्रे: एकलव्य आणि आधारशिला शिक्षण केंद्र, ऑगस्ट 2021
वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या कथेचा उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखकाचा आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कोणत्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखक-चित्रकाराशी अवश्य संपर्क करा. या व्यतिरिक्त इतर वापरासंदर्भात एकलव्य मार्फत आधारशिला शिक्षण केंद्राला संपर्क करा.

हे पुस्तक *रूखी सुखी* या नावाने एकलव्य द्वारे हिंदीत प्रकाशित.

पराग इनिशिएटीव्ह, टाटा ट्रस्टच्या अर्थसाहाय्यातून प्रकाशित

प्रकाशन: ऑगस्ट 2021/2000 प्रती
कागद: 100 gsm मैपलिथो पेपर आणि 300 gsm एफबीबी पेपरबोर्ड (मुखपृष्ठ)
ISBN: 978-93-91132-73-6
मूल्य: ₹ 50.00

प्रकाशक: **एकलव्य फाउंडेशन**
जमनालाल बजाज परिसर,
जाटखेडी, भोपाळ - 462 016 (मप्र)
फोन +91 755 255 0976, 267 1017
वेबसाइट: www.eklavya.in; ईमेल: books@eklavya.in

**आधारशिला शिक्षण केंद्र**
ग्राम सडक, पो. चाटली व्हाया- सेंघवा
जिल्हा बडवानी (म. प्र.) 451666
फोन +91 7281 283 221
ईमेल: adharshila.learningcentre@gmail.com

मुद्रक: आर के सिक्युप्रिंट, भोपाळ, फोन: +91 755 268 7589

या पुस्तकात वापरलेली काही छायाचित्रे या संकेतस्थळांवरून घेतली आहेत.

http://commons.wikimedia.org/wiki/File:Bengal_famine_image.jpg
http://www.nytimes.com/2011/09/18/books/review/three-famines-by-thomas-keneally-book-review.html?_r=0
http://jambudveep.wordpress.com/2011/01/08/an-explanatory-note-on-the-famines-in-india/
http://www.thehindu.com/features/friday-review/art/a-date-with-history/article43777.ece
http://aangirfan.blogspot.in/2010/09/churchill-was-like-hitler.html
http://www.columbia.edu/itc/mealac/pritchett/00routesdata/1600_1699/madras/famine/famine.html
https://jambudveep.wordpress.com/tag/famines/





साकड आणि आजूबाजूच्या गावात
प्रामुख्याने बारेला जमातीचे लोक राहतात.
यांच्या जगण्याचे प्रमुख साधन शेती आणि
मजुरी आहे. पूर्वी जेव्हा या भागात घनदाट
जंगले होती तेव्हा त्यांना खाण्याच्या अनेक
गोष्टी जंगलातून मिळायच्या. ते भरपूर
जनावरं पाळायचे. अन्नधान्यासाठी
शेतीवरचे अवलंबित्व तेव्हा कमी होते.
शहरांचा विकास आणि वाढत्या
लोकसंख्येमुळे जसजशी जंगले कमी झाली
तसतसे शेतीवरचे अवलंबित्व वाढत गेले.
यामुळे दुष्काळाचा लोकांवर होणार
परिणाम देखील वाढू लागला.





**रूखी-सुखी** (कोरडे- रखरखीत) हे पश्चिम निमाडमधील सर्वसाधारण लोकांच्या दुष्काळातील अनुभवांचे अनोखे दस्तावेजीकरण आहे. यात दिलेली माहिती पश्चिम निमाड जिल्ह्यातील, साकड गावातील आधारशिला शिक्षण केंद्रात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी साकड,चाटली,मोगरी आणि कुंजरी गावातल्या वयस्क लोकांना विचारून गोळा केली आहे.

या संकलनात सहभागी मित्र-मैत्रिणी:

सुनील, कमल, धारासिंह आणि पुटा मवीस, महेश, सोहनसिंग, मोहन रंदेश, जेराम, रमेश, रेखा, वंदना, रामलाल, प्रदीप, मजली, कन्हैयालाल,मुन्ना, अनिल, भावेश, सुरेश, हरिराम, निलेश, करमसिंह, प्रकाश, अजय, सायमल, गीता, फिरू, मुकेश, सुकलाल, भंवरलाल आणि खेमराज.

या शोधयात्रेत मदत करणारे शिक्षक:

वाहरू, दिलीप, प्रताप, अमित, आणि जयश्री.

हे पुस्तक इतिहास लेखन आणि अध्यापनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेच. पण अजून एक गोष्ट जी हे पुस्तक अधोरेखित करते ती म्हणजे आजच्या काळात अन्न टंचाई सारख्या संकटाशी सामना करण्यासाठी जैव विविधता हे असे शस्त्र आहे ज्यात लोकांना आणि देशाला स्वावलंबी बनवण्याची ताकद आहे.



मूल्य: 50.00

9 789391 132736

parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS

एकलव्य